**भाग-अ**

MHWS090013362020

दाखल दिनांक : १०.१२.२०२०

नोंदणी दिनांक : १०.१२.२०२०

निकाल दिनांक : १६.०५.२०२६

कालावधी : ०३व ०१म. ०९दि.

**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग (न्यायालय क्र.१), मानोरा यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : ज. तु. कोरेगांवकर)

**नियमित फौजदारी खटला क्र. १८३/२०२०** **निशाणी क्र. ५२**

गुन्हयाचा तपशिल
गुन्हा क्र. : ४९८/२०२०
पोलीस स्टेशन : मानोरा पोलीस स्टेशन, मानोरा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अधिकारी, मानोरा तालुका पोलीस स्टेशन, मानोरा. |
| अभियोगपक्षातर्फे | वि.स.स. अभियोक्ता– श्री. एम. जी. शर्मा |
| आरोपी पक्ष | नितीन श्रीधर राठोड व इतर |
| आरोपी पक्षातर्फे | विद्वान विधीज्ञ श्री.डी. ए. चव्हाण |

**भाग–ब**

**गुन्ह्याचा तपशील**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | १७.०८.२०२० |
| प्रथम खबर अहवाल तारीख | १८.०८.२०२० |
| दोषारोप दाखल तारीख | ०७.१२.२०२० |
| दोषारोप निश्चित तारीख | २१.०९.२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १९.०८.२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | १६.०५.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | -- |

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | जेलमध्ये बंद असलेला कालावधी –कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३.<br>४. | **नितीन श्रीधर राठोड**<br>वयः ३० वर्षे, धंदाः शेती<br>**श्रीधर तुळशिराम राठोड**<br>वयः ५० वर्षे, धंदाः शेती<br>**सौ. कांताबाई श्रीधर राठोड**<br>वयः ४८ वर्षे, धंदाः शेती<br>**श्रीधर तुळशिराम राठोड**<br>वयः ५० वर्षे, धंदाः शेती<br>सर्व रा. गोंडेगांव, ता.मानोरा, जि.वाशिम. | -- | -- | भा.दं.वि.चे कलम ३२४, ३२३, ५०४ प्रमाणे | निर्दोष सोडले | -- | -- |

## भाग–क
## पुरावा तपशिल

अ. – अभियोग पक्ष / सरकारी साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | दादाराव श्रीराम आडे | पंच | निशाणी क्र.३४ |
| २. | सुनिल खिरु राठोड | पंच | निशाणी क्र.३७ |
| ३. | छगन गंभीरा पवार | साक्षीदार | निशाणी क्र.४० |
| ४. | गजानन श्रीधर राठोड | साक्षीदार | निशाणी क्र.४३ |
| ५. | सोनु गजानन राठोड | खबरी | निशाणी क्र.४४ |

ब. – आरोपींचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| – | निरंक | -- | -- |

क. – न्यायालयाचे साक्षीदार

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| – | निरंक | -- | -- |

## सरकारी / आरोपीचे न्यायालयातील निशाणी दस्तऐवज

अ– सरकारी दस्तऐवज

| अ.क्र. | दस्तऐवज यादी | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | रिपोर्ट वरील सही | निशाणी क्र.४५ |

ब. आरोपींचे दस्तऐवज

| अ.क्र. | दस्तऐवज यादी | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| -- | -- | -- |

क. न्यायालयीन दस्तऐवज

| अ.क्र. | दस्तऐवज यादी | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| -- | -- | -- |

मुद्देमाल तपशिल

| अ.क्र. | साहित्य वस्तु | तपशिल |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक १६ मे, २०२६ रोजी )

आरोपी यांना भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४ अन्वये अपराधाकरीता संपरिक्षीत केले आहे.

अभियोगपक्षाच्या मते खटल्याची हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे.

२. दिनांक १७.०८.२०२० रोजी रात्री ०७:०० ते ०८:०० वाजण्याचे सुमारास ग्राम–गोंडेगांव, ता. मानोरा जि.वाशिम येथे सोनू गजानन राठोड (यापुढे त्यांना सोयीकरता 'खबरी' म्हणुन संबोधीत करण्यात येते) ह्या त्यांच्या मुलांना घरी आणत असतांना आ.क्र.१ ने ''तु तेथुन मुलांना का आणले असे म्हणाला. त्यावर खबरी हिने त्यांना आपले त्यांचेसोबत पटत नाही म्हणून आणले असे म्हणाताच आ.क्र.१ ने त्यांना शिवीगाळ केली व बाजुला

पडलेली पराटी उपटण्याचे लोखंडी अवजारा त्यांच्या डोक्यावर मारले. त्यानंतर आ.क्र.२ व ३ यांनी सुद्धा त्यांना मारहाण केली. त्यावेळी छगन गंगुराम पवार यांनी भांडणाची सोडवा सोडव केली. त्या अनुषंगाने खबरीने आरोपीं विरुध्द मानोरा पोलीस ठाणेत रिपोर्ट दिला.

३. खबर नोंदविल्यानंतर आरोपीं विरुध्द मानोरा पोलीस ठाणेत गुन्हा रजिस्टर नं.४९८/२०२० अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी श्री.जाधव पो.हे.कॉ. (बक्कल नं.६५१) यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले. सदरील अपराध सिध्द करण्याकरीता पुरेसा पुरावा उपलब्ध झाल्याने आरोपीं विरुध्द दोषारोपत्र दाखल केले.

४. आरोपीं विरुध्द दोषारोप (निशाणी क्र.२३) निश्चीत केले. त्यातील माहिती आरोपींना त्यांच्या बोली भाषेमध्ये वाचुन व समजावून सांगितली. ती त्यांना समजली. त्यानंतर त्यांचे प्रतिकथन नोंदविण्यात आले. आरोपींनी प्रतिकथनामध्ये गुन्हा कबुल न करता खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. खटल्यामध्ये आरोपींचे विरुध्द पुरावा न आलेने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ (१)(ब) अन्वये निवेदन नोंदविले नाही.

५. न्यायालयासमोरील पुराव्याचे अवलोकन करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उध्दभवले त्यावर माझा निष्कर्ष मी पुढील कारणमिमांसेसह देत आहे :

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १७.०८.२०२० रोजी रात्री ०७:०० वाजण्याचे सुमारास ग्राम–गोंडेगांव, ता.मानोरा, जि.वाशिम येथे आरोपींनी संगणमत करुन खबरी यांना लोखंडी वस्तुने मारहाण करुन जखमी केल्याचे आणि त्याद्वारे भारतीय दंड विधानचे कलम ३२४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिद्ध करतो काय ? | ... नाही |

| | | |
|---|---|---|
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन खबरी हिला मारहाण करुन जखमी केल्याचे आणि त्याद्वारे भा.दं.वि. कलम ३२३ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | ... नाही |
| ३. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन खबरीला जाणीवपुर्वक शिविगाळ करुन त्यांना प्रक्षोभित केल्याचे आणि त्याद्वारे भारतीय दंड विधानचे कलम ५०४ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिद्ध करतो काय ? | ... नाही |
| ४. | आरोपीं विरुद्ध कुठला गुन्हा सिद्ध झाला आहे काय ? | ... नाही |
| ५. | काय आदेश | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

६. आरोपींवरील आरोप सिध्द करणेकामी अभियोग पक्षाने एकूण पाच साक्षीदार तपासले. घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार दादाराव श्रीराम ओड व सुनिल खिरु राठोड (साक्षीदार क्र.१ व २), प्रत्यक्षदर्शी साक्षीदार छगन गंभीरा पवार (साक्षीदार क्र.३), गजानन श्रीधर राठोड (साक्षीदार क्र.४) व खबरी सोनु गजानन राठोड (साक्षीदार क्र.५) यांची साक्ष नोंदवली.

## <u>कारणमिमांसा</u>

<u>मुद्दे क्र.१ ते ३ करीता</u> :

७. वरील मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने चर्चेकरीता एकत्रीत विचारात घेण्यात येत आहे. खबरी (साक्षीदार क्र.५) यांच्या साक्षीनुसार, आरोपी त्यांचे नातेवाईक आहेत. घटना कधी घडली हे त्यांना आठवत नाही. घटनेच्या दिवशी आरोपींसोबत त्यांची फक्त बोलचाल झाली होती. याव्यतिरीक्त आणखी काही झाले नव्हते. त्यांनी रागाच्या भरात आरोपींविरुद्ध तक्रार दिली. तक्रारवर त्यांचा निशाणी अंगठा आहे. परंतु, त्यामधील मजकुराबाबत त्यांना

काही माहित नाही. सदर साक्षीदाराने घटनेच्या मुद्यावर अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही. म्हणून विद्वान सरकारी वकिलांनी उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारले. परंतु, अभियोग पक्षाचा उपयोगात येईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर आणण्यात आलेला नाही. तसेच खबरी (साक्षीदार क्र.१) यांनी उलटतपासणीमध्ये आरोपींनी त्यांना मारहाण केल्याची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार छगन (साक्षीदार क्र.३) हे प्रकरणातील महत्वपुर्ण व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुन त्यांनी सुद्धा अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. सदर खबरी (साक्षीदार क्र.५) व छगन (साक्षीदार क्र.३) यांची साक्ष अभियोग पक्षाच्या कथनाला दुजोरा देत नसल्यामुळे त्यांची साक्ष आरोपींवरील गुन्हा सिद्ध करण्यास उपयुक्त ठरत नाही.

८. खबरी हिचे पती गजानन (साक्षीदार क्र.३) यांनी सुद्धा घटनेबाबत काहीही सांगितले नाही. त्यांनी घटनेची बाब स्पष्टपणे नकारली आहे. घटनास्थळावरील पंच साक्षीदार दादाराव व सुनिल (साक्षीदार क्र.१ व २) यांनी घटनास्थळ त्यांचे समक्ष तयार करण्याची बाब नाकारली आहे. म्हणून वरील साक्षदार यांच्या साक्षेवर विश्वास ठेवता येत नाही.

९. अभियोग पक्षाला पुरेशी संधी देवून सुद्धा अभियोग पक्ष इतर साक्षीदार, वैद्यकिय अधिकारी आणि तपासी अधिकारी यांचा पुरावा नोंदवू शकला नाही. त्यामुळे अभियोगपक्ष घटनास्थळ पंचनामा सिद्ध करु शकला नाही. त्यामुळे सदर घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी खबरी हिला कथित मारहाण करुन जखमी केल्याचे तसेच शिवीगाळ केल्याबाबत अभिलेखावर कोणताही स्पष्ट पुरावा आणण्यात आलेला नाही. करीता मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदविला आहे.

<u>मुद्दा क्र.४ करीता</u> :

१०. सबळ पुराव्याअभावी अभियोपक्ष आरोपीं विरुध्द असलेला आरोप सिध्द न

करु शकल्याने आरोपीं विरुध्द कुठलाही गुन्हा सिध्द झाला नाही. करीता आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहेत. करीता मुद्दा क्र.४ चा निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदविला आहे.

मुद्दा क्र.५ करीता :

११. वरील सर्व विवेचनांवरुन व अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करणे न्यायोचीत ठरते. करीता पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ **नितीन श्रीधर राठोड,** आरोपी क्र.२ **श्रीधर तुळशिराम राठोड,** आरोपी क्र.१ **सौ. कांताबाई श्रीधर राठोड** यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४ अन्वयेच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचा वैयक्तीक जामीन कदबा व बंधपत्र रद्द/अभ्यर्पित करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल एक लोखंडी पऱ्हाटी उपटण्याचा अवजार याचा अपिल कालावधीनंतर जाहीर लिलाव करुन आलेली रक्कम नियमाप्रमाणे सरकार जमा करावी.

४. आरोपींनी अपिलीय न्यायालयात ज्यावेळी नोटीस काढली जाईल त्यावेळ उपस्थित राहण्याकरीता फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ नुसार रक्कम प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/ चे जामीन बंधपत्र पुढील सहा महिन्याच्या कालावधीकरीता या न्यायालयाकडे द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केले. )

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by JAGDISH TULSIDAS KOREGAONKAR
Date: 2026.05.16 16:43:14 +0530

मानोरा
दिनांक : १६.०५.२०२६

(ज. तु. कोरेगांवकर )
न्यायदंडाधिकारी (प्र.श्रे.),
(न्यायालय क्र.२), मानोरा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी हमी देते की, सदरच्या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | कु. आर. के. चव्हाण (ग्रेड-३) |
| न्यायालय | (श्री. ज. तु. कोरेगांवकर )<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मानोरा. |
| न्यायनिर्णय घोषीत दिनांक | १६.०५.२०२६ |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | १६.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केलेले दिनांक | १६.०५.२०२६ |